

# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल



प्रा. अमर जावळे

प्रा. भूषण काटे - पाटील

LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS

Scanned by CamScanner

# संपादक परिचय



**प्रा. अमर वसंत जावळे**

12 वर्षे अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन

समन्वयक : सरदार वल्लभभाई अध्यापन व संशोधन केंद्र

जिल्हा समन्वयक : विद्यार्थी कल्याण विभाग उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ जळगाव.

संशोधन : लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, पी.एच.डी. संशोधन सुरु आहे. विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित, कार्यशाळा, चर्चासत्रांमध्ये सहभाग

पुरस्कार : उत्कृष्ट रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

संपादन : लोकसेवक



**प्रा. भूषण ज्ञानदेव पाटील**

10 वर्षांपासून अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे मराठी विषयाचे अध्यापन

समन्वयक : इंदिरा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र

संशोधन : पी.एच.डी. संशोधन कार्य अंतिम टप्प्यात, लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित राष्ट्रीय परिषद समन्वयक

संपादन : लोकसेवक

लेखन : महानाट्य – स्वराज्याची शिवगर्जना,
1 लघुपट,
1 चित्रपट पटकथालेखन, दिग्दर्शन,
3 गीतांचे ध्वनीमुद्रण, दोन गीतांचा प्रायोगिक चित्रपटांमध्ये समावेश.

ISBN 978-0-359-01299-2
90000
9 780359 012992

Printed by
LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur
Ph.: [illegible]
Email.: [illegible]
Website.: lbp.world

Published by
Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | पंतप्रधान इंदिराजी: आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप | १ |
| २ | सरदार वल्लभभाई पटेल आणि राजस्थान | १२ |
| ३ | इंदिरा पर्वातील राष्ट्रीय आणीबाणी - एक अभ्यास | १६ |
| ४ | स्व.इंदिरा गांधीच्या छत्रछायेतील काही वर्ष | २३ |
| ५ | **संस्थान के विलीनीकरण मे सरदार वल्लभभाई पटेल कि भूमिका** | २८ |
| ६ | **स्व.इंदिराजी गांधी यांच्या कारकीर्दिमधून नेतृत्व विकासाचे धडे** | ३३ |
| ७ | संस्थानिकांच्या विलिनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | ३८ |
| ८ | Vallabhbhai Jhaverbhai Patel and Faizpur Congress १९३६ | ४२ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक | ५४ |
| १० | स्वर्गीय इंदिरा गांधी :: एक कणखर महिला नेतृत्व | ५८ |
| ११ | भारतीय राजनिती का चमकता तारा :- इंदिरा गांधी | ६१ |
| १२ | भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान | ६४ |
| १३ | **श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्रीय धोरण व भारतीय सुरक्षा** | ७० |
| १४ | लोह पुरुष आणि लेडी सरदार | ७४ |
| १५ | देशप्रेमी प्रियदर्शनी इंदिरा | ७८ |
| १६ | अखंडीत भारताचे प्रेणेते :- सरदार वल्लभभाई पटेल | ८० |
| १७ | इंदिरा गांधी - एक कार्यकाल नेतृत्व | ८३ |
| १८ | भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान | ८४ |
| १९ | इंदीरागांधी समग्र विचार : आधुनिक काळाची गरज | ९१ |
| २० | भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान एक कणखर नेत्या - श्रीमती इंदीरा गांधी | ९५ |
| २१ | आणीबाणी "विरोधकांची" | ९९ |


Scanned by CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक

**प्रा. अमर वसंत जावळे**

समन्वयक,सरदार पटेल अध्ययन व संशोधन केंद्र.

जेव्हा हंगामी सरकारमध्ये पेचप्रसंग निर्माण झालेला असतानाच ऑक्टोंबर 1946 मध्ये त्या वेळच्या गृहमंत्र्यांनी प्रशासकीय परीक्षांद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्त्या थांबवल्या. सत्तेच हस्तांतरण होण्याच्या आधी प्रशासकीय अधिकाऱ्याचा पुरवठा करणारी हि सेवा बंद होणे धोकादायक होत. या प्रशासकीय सेवेच्या आधारेच ब्रिटिशांनी आपल साम्राज्य उभ केल होत. स्वतंत्र भारतातही प्रशासकीय अधिकाऱ्याची अशा पोलादी चौकात असं आवश्यक होत. ब्रिटिशाकडून सत्ता हाती आल्यानंतर स्वतंत्र टिकविण्यासाठी आणि सरकार भक्कम प्रशासकीय यंत्रणा उभी कारण आवश्यक असल्याच सर्वात प्रथम पटेलांच्या लक्षात आल.

कल्पना मनात येताच पटेल लगेच कामाला लागले. त्यांनी प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांची (त्या वेळी त्यांना पंतप्रधान म्हणत) एक बैठक बोलावली आणि त्या बैठकीत हि कल्पना मंडळी. आय.सी.एस दर्जाचे बहुतांश ब्रिटीश अधिकारी मुस्लीम धर्मीय होते. पटेलांनी आय.सी.एस. ला पर्याय म्हणून इंडियन अड्मिनीस्त्रेतीवे सर्विस (आय.ए.एस) हि प्रशासकीय सेवा सुरु केली. आय.सी एस. अधिकाऱ्यांच्या जागी तातडीने आय.ए.एस या भारतीय प्रशाकीय सेवेतले अधिकारी नेमण्याचे आदेश त्यांनी दिले.

अनेक मुख्यमंत्र्यांना पटेलांचा हा निर्णय आवडला नाही. त्यांना त्यांच्या प्रांतातलेच प्रशासकीय अधिकारी हवे होते, जे पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणात राहिले असते. बी.के.नेहरू यांच्या मते राजकीय दृष्ट्या अतिशय शक्तिशाली असलेल्या या मुख्यमंत्र्यांचा विरोध असलेली कल्पना त्यांच्या गळ्यात उतरवण्याचे सामर्थ्य फक्त पटेलांमध्ये होते. पटेलांनी 10 ऑक्टोंबर 1949 रोजी घटना समितीपुढे सांगितलं की, अखिल भारतीय स्वरुपाची स्वतंत्र अशी प्रशासकीय यंत्रणा नसेल, तर आपल स्वतंत्र फार काळ टिकणार नाही.

वेळ खूपच कमी असल्यामुळे 5 जुलै 1947 पूर्वी स्पर्धात्मक परीक्षा घेण शक्य नव्हत. तो पर्यंत वाट पाहनं पटेलांना शक्य नव्हत. दिल्लीतल्या मेटकाफ हाउसमध्ये एप्रिल 1947 मध्ये आय.सी.एस. परीक्षेसाठी प्रशिक्षण घेनाऱ्याची नियुक्ती कण्याचा धाडसी निर्णय पटेलांनी घेतला. इंग्लंडने सत्तांतराची तारीख अद्याप जाहीर केली नव्हती. पण प्रशासकीय अधिकऱ्यांच्या अभावी प्रशासन कोलमडू नये, अस पटेलांना वाटत होत. "आय.सी.एस. चे दिवस आता संपल्यात जमा आहेत आणि आय.ए.एस मधून आलेले अधिकारी आता त्यांची जागा घेतील". अस पटेल या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यापुढे बोलताना तीव्र बुध्दी आणि कणखर मन यांमुळे पटेल कोणत्याही गोष्टीबाबत झटकन निर्णय घेत. त्यांचा निर्णय त्या-त्या वेळच्या परिस्थितीवर आधारित असे. राजकीय नेते नव्हे, तर प्रामाणिक अधिकारीच आपली इच्छा योग्य पद्धतीने राबवतील हे त्यांना



Scanned by CamScanner

हित होत. त्यामुळेच 1947 मध्ये विविध पदांवर असणाऱ्या अनेक आय.सी.एस. अधिकाऱ्यांना त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत सामावून घेतलं. मंत्री येतील आणि जातील पण प्रामाणिक आणि नि:पक्ष प्रशासकीय यंत्रणा कायम कार्यरत राहिली पाहिजे. अस त्याचं मत होत. नेहरू प्रशासकीय अधिकाऱ्याबरोबर अंतर ठेवून वागत; त्यांच्याशी दुरावा ठेवत. पण पटेल मात्र त्या अधिकाऱ्याच म्हणन निट ऐकून घेत. त्यांनी सुचविलेल्या चांगल्या गोष्टींचा ते लगेच स्वीकार करत.

पटेल स्वत: कार्यक्षम प्रशासक होते पण त्यांची काम करण्याची पद्धत वेगळीच असे. ते त्याचं बहुतांश काम घरातूनच करत. मध्यरात्रीपर्यंत जगात फायलींमध्ये डोक खुपसून ते कधीच बसत नसत. एखाद्या प्रश्नाची ते सचिवांकडून माहिती जाणून घेत आणि तिथल्या तिथे त्याबाबतचा निर्णय देत असत.कोणताही प्रश्न ते अतिशय कमी वेळात आणि परिणाम काकीत्या सोडवत. त्यांचे सचिव त्या प्रश्नाची थोडक्यात माहिती त्यांना देत. त्यावर निर्णय देत. हे निर्णय तोंडी असले तरी पटेलांनी एकदाही शब्द फिरविला नाही. एकदा दिलेल्या निर्णयावर ते ठाम असत. त्यांची स्मरणशक्ती अतिशय तीव्र होती.

पटेलांचा त्यांच्या सहकार्यावर पूर्ण विश्वास होता. अयंगार यांनी एक अनुभव सांगितला आहे. एका जेष्ठ नेत्ये उपोषणाची धमकी देवून काही मागण्या केल्या होत्या. त्या माफ्न्या मान्य करण्याची सरकारची तयारी नवती त्या नेत्याने कडक भाषेतच एक पत्र गृहमंत्रालयाला पाठवलं. अय्यंगार यांनी त्या पात्रातले मुद्दे पटेलांना सांगितले व पत्र प्रत्यक्ष पाहण्यासाठी पटेलांकडे देऊ केल. पण पटेल त्यांना थांबवत म्हणाले. "सगळे मुद्दे तुम्ही संफितले आहेत नां? मग मला प्रत्यक्ष पत्र पाहण्याची फराज नाही" वरिष्ठ प्रशासकीय अधिकार्यांच मत ते नेहमी जाणून घेत असत. "माझा निर्णय पुर्व्ग्रदुशीत असू नये व माझ्याकडून चूक घडू नये म्हणून मी तुमच मत विचारतो तुमच मत आणि माझ मत यांच्या आधारावर मला निर्णय घेण सोप जात." अस ते म्हणत.

पटेल मुळातच लोकशाहीवादी होते. त्यामुळे ते त्यांच्या हाताखालच्या अधिकार्यांना पूर्ण स्वातंर्त्य देत असत. "तुम्ही विचार करून योग्य निर्णय घ्या" अस ते नेहमी सांगत असत. "माझ्या विरोधातलं मतही तितक्याच मोकळ्या पाने व ठामपणाने मंडळ पाहिजे. तास झाल तरच मला योग्य निर्णय घेता येईल. आपले मंत्री नाराज होतील या भीतीपेक्षा तुम्ही तुमच प्रामाणिक मत मांडत नसाल तर तुम्ही राजीनामा दिलेला बारा; मी तुमच्यावर कधीही नाराज होणार नाही." असं ते म्हणत एस.एल. लाल यांना त्यांनी एकदा माउंटब्याटन विषयी मत विचारले होते. अन्य एका कॅबिनेट मंत्री चा लाल यांना वाईट अनुभव होता. त्यामुळे "तुम्हाला माझ प्रामाणिक मत हवे आहे का?" असे लाल यांनी पटेलांना विचारलं. त्यावर पटेल एकदम चिडले, "अप्रामाणिक मत देण्यासाठी सरकारने एवढा मोठा पगार देऊन तुम्हाला नोकरीवर ठेवलाय का? असा प्रतिप्रश्न त्यांनी केला. "तुमच मत स्वीकारायच की नाही हा माझा प्रश्न आहे." अस ते म्हणाले "त्यानंतर आपण पटेलांशी बोलतांना आपल प्रामाणिक मत मांडायला कधीही कचरलो नाही." अस लाल त्यांनी लिहीले आहे.

"आंध्र भाषिक राज्य निर्माण करायचा ठराव मंत्रीमंडळाने केला होता. पंडित नेहरू. आझाद, पटेल यांच्या उपस्थितीत हा ठराव देऊन झाला होता. पण तो अमलात आणणं कठीण व धाकादायक होत. याबाबत आपण काय करावं? असा सल्ला अय्यंगार यांनी पटेलांना विचारला तेव्हा ते ताडकन



Scanned by CamScanner

म्हणाले, "तुम्ही गृहसचिव आहात नं? मग तुमचा कर्तव्य पार पाडा. तुम्हाला हा ठराव चुकीचा वाटत असेल तर तशी स्पष्ट टीप लिहून मंत्रिमंडळाला सदर करा. तुम्ही कोण आहात आणि ठराव कोणी केला आहे याला मुळीच महत्व नाही. "त्याचं म्हणणं ऐकून आपण एक टीप मंत्रिमंडळाला दिली. नंतर ही अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली." असा एक अनुभव अय्यंगार यांनी लिहिला आहे. भाषिक आधारावर राज्यांची निर्मिती करण्यास पटेलांचा विरोध होता. त्यामुळे देशाची एकात्मता धोक्यात येईल व विघातक शक्तींचा जोर वाढेल असे त्यांना वाटत होते. पटेलांच्या मृत्युपर्यंत हा ठराव तसाच राहिला. आंध्रच पाहिलं भाषिक राज्य पटेलांच्या मृत्युनंतर दोन वर्षांनी म्हणजे 1952 मध्ये अस्तित्वात आले.

गृहसचिव या नात्याने पटेलांच्या किंवा पंतप्रधानांच्या अनुपस्थितीत आपल्याल्या काही वेळा घाईघाईने निर्णय घ्यावे लागत काही वेळा तो निर्णय पटेलांना मान्य नसे. पण जेव्हा मंत्रिमंडळासमोर तो निर्णय येई तेव्हा तो आपलाच निर्णय होता. असे पटेल सांगतात व तो प्रश्न तिथच संपत असे. पटेल दरवेळी आपल्या गृह्सचीवाच्या मागे खंबीरपणे उभे राहत असत. व्ही.पी.मेनन यांच्यावरही पटेलांचा असाच विश्वास होता. पटेल आपल्युं सचिवांना अत्यंत आदराची वागणूक देत असत. ते अतिशय शांत होते. आणि प्रसंग कितीही कठीण असला तरी त्याच चित्त विचलित होत नसे. "1947 च्या ऑगस्ट महिन्या शिखांनी दिल्लीवर नियंत्रण प्रस्थापित केल होत. त्या वेळी अतिशय तंग वातावरनात मंत्रिमंडळाची बैठक झाली. माउंटबॅटन यांच्या एका बाजूला नेहरू व दुसऱ्या बाजूला पटेल बसले होते. लष्कर आणि हवाईदलाच्या प्रमुखांनाही बोलावण्यात आले होते. वातावरण खूपच तणावपूर्ण होते. पटेलांनी एकदम एक विनोद केला. सगळे हसले आणि तणाव निवळला. नंतर चर्चा करून योग्य निर्णय घेण्यात आला. "अशी एक आठवण त्यावेळचे हवाईदल प्रमुख थोमास इमाहीस्ट यांनी दिली आहे

लोकांचे प्रश्न सोडवाना पटेलांची भूमिका अतिशय न्याय, खुली आणि वास्तववादी असे; बिकानेरच्या जहागिरदारांना एकदा अवघ्या 15 मिनिटांचा वेळ दिलेला असतानाही पटेलांनी त्याचं म्हणने तासभर शांतपणाने ऐकलं होतं. नंतर त्यांनी जहागीदारांची अडचण दूर करणारा निर्णय दिला.

पंडित नेहरुंबरोबरही पटेलांचे अनेक वेळा मतभेद झाले.नेहरू आणि पटेल यांचे मतभेद गांधीजींना मिटवता आले नाहीत.गांधीनी नेहरूंनाच मी नेता मानीन असे वचन पटेलांकडून घेतलं होतं. त्यांनी ते अखेरपर्यंत पाळलं. एका अर्थाने पटेलांचा हा असामान्य त्याग होता कारण पक्षात बहुमत त्यांचामागे होते आणि नेहरू हे निवडून आलेले नेते नव्हते: ते गांधीजींनी नेमलेले नेते होते.

ब्रिटीश साम्राज्यातून भारत बाहेर गेल्याबद्दल चर्चिलना वाईट वाटत होत. भारताचा अपमान करायची एकही संधी ते सोडत नव्हते. सत्तांतरानंतर एकदा ते म्हणाले."भारतचं प्रशासन पेंढा भरलेल्या माणसांकडे आम्ही दिलं आहे."चार्चीलना दिलेल्या सणसणीत उत्तरात पटेलांनी 'निर्लज्ज साम्राज्यवादी' असा चर्चिल यांचा उल्लेख केला होता. "हुशारी आणि तर्क्सुसंगतता यापेक्षा मूर्खपणा आणि मुजोरी त्यांच्यावर स्वार असते." अशा शब्दात त्यांनी ब्रिटीश राज्यकर्त्यांचा उल्लेख केला होता. "ब्रिटनला जर भारताबरोबर मैत्री हवी असेल तर ही असली भाषा आधी बंद करा." असं



Scanned by CamScanner

खडसावलं होतं. पटेलांच्या या बाणेदारपणाचे खुद्द चार्चीलनेही नंतर कौतुक केले. आणि हेच त्या प्रशासकीय कौशल्याचं खर गमक होतं.

निष्कर्ष:-

1. भारतात एकाच स्वरुपाची भक्कम प्रशासकीय यंत्रणा पटेलांनी उभी केली.
2. स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रशिक्षण घेणाऱ्यांची नियुक्ती हा धाडसी निर्णय पटेलांनी सुरु केला.
3. प्रामाणिक अधिकारीच योग्य पद्धतीने प्रशासकीय सेवा करू शकतात.
4. पटेल स्वत: कार्यक्षम प्रशासक होते.
5. पटेलांचा त्यांच्या सहकार्यांवर पूर्ण विश्वास होता.
6. पटेल मुळातच लोकशाहीवादी होते.
7. मंत्रिमंडळाच्या एकमताने निर्णय घेणारे पटेल होते. त्यांची भूमिका अतिशय न्याय, खुली आणि वास्तववादी असे.
8. कोणत्याही गोष्टींची निर्णय झाला की ते अवचित्य बनत.

संदर्भ ग्रंथ:-


1. बी.आर. नंदा :- महात्मा गांधी
2. लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल:- बी.कृष्णा.
3. भारतीय प्रशासन सेवा 71-72




Scanned by CamScanner